# रामायण व महाभारताची ऐतिहासिक समीक्षा

डॉ.नी.र. वऱ्हाडपांडे

अखिल भारतात रामायण आणि महाभारत हे ग्रंथ समाजातल्या सर्व स्तरात वाचले वा ऐकले जातात. जवळ जवळ प्रत्येक आधुनिक भारतीय भाषेत या ग्रंथांची कथा सांगणारे ग्रंथ व त्यावर कादंबऱ्या नाटके, काव्ये वगैरे झालेली आहेत.

ग्रंथांची समीक्षा करणारेही बरेच वाङ्मय निर्माण झालेले आहे. मराठीत बाळशास्त्री हरदास यांचे विवेचन विशेष लोकप्रिय झाले आहे. तसेच इरावती कर्वे, दुर्गा भागवत, आनंद साधले वगैरेंचेही ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

हे सर्व विवेचन रामायण व महाभारत हे सलग ग्रंथ समजून करण्यात आलेले आहे. त्यात व्यक्तिदर्शन, तत्त्वज्ञान, साहित्यिक सौंदर्य वगेरेंचा विचार आहे. असा विचार मोलाचा आहे

पण या व्यतिरिक्त वरील ग्रंथाकडे पाहण्याची आणखी एक दृष्टि आहे. ती म्हणजे ऐतिहासिक दृष्टि. राम रावणयुद्ध व भारतीय युद्ध खरोखरच झाले काय? की या युद्धाच्या कथा ही एक कादंबरी आहे? ही युद्धे झाली असल्यास केव्हा झाली? त्यांचे ऐतिहासिक स्वरूप काय होते? रामायण महाभारत हे ग्रंथ केव्हा लिहिले गेले? त्यांत कोणत्या समाजस्थितीचे दर्शन होते या प्रश्नांचा विचार देखील आवश्यक आहे. असा विचार करणारा मराठीतील प्रसिद्ध ग्रंथ चिं. वि. वैद्य यांचा महाभारताचा उपसंहार हा होय. या तऱ्हेचे वाङ्मय मराठीपेक्षा इंग्रजीत जास्त प्रकाशित झालेले आहे.

वरील प्रश्न ज्यांच्या मनात उद्‌भवतच नाहीत असे कोणी असतील असे वाटत नाही. पण एक बराच मोठा वर्ग असा आहे की ज्याला हे प्रश्न उपस्थित केलेले आवडत नाही. हा वर्ग रामायण व महाभारताकडे चिकित्सेच्या दृष्टिने न पाहता धर्मग्रंथ म्हणून पाहणारा आहे. राम व कृष्ण हे ईश्वराचे अवतार होते व त्यांची चरित्रे वाचल्याने व ऐकल्याने पुण्य लागते म्हणून रामायण व महाभारताचे श्रवण करायचे, राम व कृष्ण झाले की नाही यावर शंका काढणे हे पाप आहे. रामायण, महाभारत देवतुल्य अशा व्यास वाल्मीकि या ऋषींनी लिहिले आहे, त्यातले प्रत्येक वाक्य हे ऐतिहासिक दृष्ट्याच नव्हे तर तत्त्वज्ञानदृष्ट्या देखील सत्य आहे अशी या वर्गाची भूमिका आहे.

रामायण व महाभारताचे ऐतिहासिक समालोचन करण्याचा आव आणणारा असा देखील एक वर्ग आहे. पण या वर्गाला इतिहासात तादृश रस नाही. इतिहासाच्या नावाखाली त्याला स्वप्नरंजन करायचे असते. प्राचीन भारतीय हे तुमच्याआमच्या सारखे मानव नसून दैवी लोक होते. त्यांची संस्कृती व ज्ञान परिपूर्णतेला पोचलेले होते, आज अस्तित्वात असलेले कोणतेच विज्ञान त्यांना अज्ञात नव्हते. एवढेच नव्हे तर आजच्या विज्ञानाला माहीत नसलेले एक अतिविज्ञान त्यांना अवगत होते व ते म्हणजे मंत्रशक्ति व शापशक्तीच्या बळाने चमत्कार घडवून आणणे. हे सर्व द्वापर युगापर्यंत कायम होते, त्यानंतर कलियुग लागले व मानवाची अधोगती झाली. या युगात प्राचीन भारतीयांची सारी संस्कृती व ज्ञानविज्ञान नष्ट झाले. हे सारे सिद्ध करण्यासाठी हे लोक प्राचीन वाङ्मयाचे मन:पूत अर्थ करतात व पुराण ग्रंथातील अदभूत घटना काल्पनिक नसून अक्षरश: खऱ्या आहेत असा आग्रह धरतात.

या लेखातील विवेचन वरील कोणत्याच वर्गात मोडणारे नाही. प्राचीन भारतात खरोखर काय होते व त्याकाळचा भारतीय समाज कसा होता याचे शक्य तितके यथार्थ ज्ञान करून घेण्याची मला इच्छा आहे व त्यासाठी सर्व उपलब्ध साधने वापरून व त्यांची काटेकोर वैज्ञानिक पद्धतीने छाननी करून निष्कर्ष काढण्याची माझी प्रतिज्ञा आहे. असे निष्कर्ष काढताना मी भारतीय आहे व माझे पूर्वज म्हणून प्राचीन भारतीयांचा मी गौरवच केला पाहिजे असे मला वाटत नाही.

### प्रागैतिहासिक भारतातील विज्ञान

प्राचीन भारतीय, म्हणजे कलियुग सुरू होण्यापूर्वीचे वेद, रामायण व महाभारत वगैरे ग्रंथात उल्लेखिलले भारतीय हे दैवी गुणांनी युक्त असे भारतीय होते व कलियुगाच्या आरंभानंतर भारतात हळुहळू मानवाची अधोगती होऊ लागली. ही अधोगतीची दिशा कधी बदलली नाही ही एक घातक अंधश्रद्धा आहे. कलियुग सुरू होण्यापूर्वीचे भारतीय हेही तुमच्या आमच्या सारखेच मानव होते याबद्दल भरपूर पुरावा उपलब्ध आहे. प्राचीन भारतीय हजारो नाही तर निदान शेकडो वर्षे जगत असे सांगण्यात येते पण या काळचे जे मानवी सांगाडे उपलब्ध आहेत त्यातला एकही

साठीनंतर जिवंत होता असे दिसत नाही. कलियुगातली माणसे ठेंगणीठुसकी झाली. द्वापर व कृत युगातली धिप्पाड देहाची असत हीही एक निराधार समजूत आहे. कलियुगात माणसाच्या आयुष्याप्रमाणे त्यांचा बांधाही मोठा झाला असे विधान साधारपणे करता येते. मेलेल्या माणसाचा मेंदू हजारो वर्षानंतर सापडू शकत नाही त्यामुळे कलियुगातील माणसांची बुद्धि पूर्वीच्या युगातील प्राणसापेक्षा कमी आहे की काय हे निर्णयकपणे सांगता येत नाही. पण भारतात विज्ञानाची अभूतपूर्व प्रगति कलियुगातच म्हणजे इसवी सनाच्या पहिल्या व त्यापूर्वीच्या पहिल्या सहस्रकात झाली यावरून कलियुगातील मानव बुद्धीच्या बाबतीत त्यापूर्वीच्या मानवाला हार जाणारा नव्हता असे म्हणण्यास हरकत नाही.

प्राचीन भारतीय सर्वज्ञ होते व त्यांना आजचे विज्ञानच केवळ नव्हे तर त्यापेक्षा श्रेष्ठ असे मन्त्रशक्ति, योग आदि परमविज्ञान अवगत होते हीही एक भाबडी समजूत आहे. रामाच्या काळी विमान होते. कारण रामायणांत पुष्पक विमानाचे वर्णन आहे. मन्त्रशक्तीने चालणारी ब्रह्मास्त्रासारखी अस्त्रे होती, कारण त्यांची रामायण महाभारतादिकात प्रदीर्घ वर्णने आहेत असे मानायचे तर अरेबियन नाईटसमध्ये जादूची सतरंजी, अंगठी घालताच प्रकट होणारा व साऱ्या कामना पूर्ण करणारा राक्षस इत्यादि गोष्टी आहेत, बायबलात येशूने मेलेली माणसे जिवंत केली व तो समुद्रावरून चालत गेला अशी वर्णने आहेत. यावरून प्राचीन अरबांना व ज्यूंना आधुनिक विज्ञानापेक्षा अधिक सामर्थ्यशाली अशा या संजीवनीच्या उडण्याच्या व राक्षस प्रकट करण्याच्या विद्या अवगत होत्या असे का मानू नये?

प्राचीन काळी भारतीयांना सर्व आधुनिक विज्ञान ज्ञात होते असा दावा सांगणारे, प्राचीन भारतीय म्हणजे बुद्धपूर्व भारतीय असा अर्थ करीत असतात किंवा त्यांनी केला पाहिजे, कारण बुद्धोत्तर भारताचा बराच इतिहास ज्ञात आहे. या काळात भारताचा बाहेरच्या जगाशी बराच संबंध आला व भारताबद्दल भारतीय तसेच अभारतीय असे बरेच वाङ्मय उपलब्ध आहे. या साऱ्या वाङ्मयात आधुनिक विज्ञानाचा मागमूसही नाही.

बुद्धपूर्व भारतात सर्व विज्ञान ज्ञात होते पण काही तर प्रलय झाल्यामुळे ते नष्ट झाले असे मानण्यास काही आधार नाही. हजारो वर्षापूर्वी पृथ्वीवर झालेल्या अनर्थांची बरीच माहिती भौमिकांना आहे, त्यात कलियुगारंभा नंतर साऱ्या भारताचे ज्ञान नष्ट होईल असा कोणताही अनर्थ झाल्याचे प्रमाण नाही. भारतीय युद्ध हा असा अनर्थ होता असे म्हणता येत नाही. भारतीय युद्धात जो काही नाश झाला तो कुरूक्षेत्रावर झाला. त्यानंतर युधिष्ठिराने ३६ वर्षे राज्य केले. युधिष्ठिर हा चांगला राज्यकर्ता होता व त्याच्या राज्यात भारताची स्थिति उत्तम होती असे महाभारत सांगते. शिवाय एखाद्या अनर्थाने एखाद्या समाजाचे ज्ञानविज्ञान नष्ट झाले तरी या नाशाचेही अवशेष सापडतात पूर्वी असे ज्ञान होते याचा पुरावा मिळतो. सिंधूसंस्कृतीच्या उत्खननात पाच हजार वर्षापूर्वीच्या नगररचनेचा, लिपीचा व मूर्तिकलेचा पुरावा मिळतो. प्राचीन भारतात विमानाचे कारखाने असल्याचा असा पुरावा कोठेही मिळत नाही. तात्पर्य कलियुगपूर्व भारतीयांना आधुनिक विज्ञानाचे ज्ञान होते हे एक वेडगळ स्वप्नरंजन आहे.

**अदभूतरम्य ग्रंथ**

रामायणात पुष्पक विमानाचे जे वर्णन आहे त्यावरून ते वर्णन करणाऱ्या कवीने विमान कधीही पाहिले नव्हते हे उघड होते. पुष्पक विमान हंसयुक्त होते म्हणजे त्याला हंस जोडलेले होते. बैल जोडल्याने जशी बैलगाडी होते तसे हंस जोडल्याने विमान होते अशी या कवीची समजूत आहे.

रामायणातच अनेक ठिकाणी रावणाने सीतेला विमानातून नेली नसून खेचरांच्या रथातून नेली असे वर्णन आहे. म्हणजे लंकेला जाण्यासाठी भूमार्ग देखील होता. याची पुष्टि एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाने होते. या ज्ञानकोशात असे लिहिले आहे की १४८० पर्यंत लंका व भारत यांच्या मध्ये भूमार्ग होता. १४८० मध्ये एक भूकंप झाला व त्यामुळे त्या भूमार्गात मोठमोठी खिंडारे पडली. पण

खिंडारे पडून देखील या खिंडारातील समुद्र पुरूषभराशिवाय कोठेही खोल नाही.

तात्पर्य, रामायणातील विमानाचा भाग मूळ रामायणात नव्हता. वरील विवेचनावर काही लोक म्हणतात की विज्ञान म्हणजे आजचे जड विज्ञान असे समीकरण तुम्ही करीत आहा. आमच्या पूर्वजांना जे विज्ञान माहीत होते ते आध्यात्मिक विज्ञान होते. त्यांची विमाने कारखान्यात तयार केलेली धातूची विमाने नव्हती. ते योगशास्त्राच्या बळावर आकाशगमन करीत. त्यांची अस्त्रे ही आजच्यासारखी कारखान्यात तयार केलेली नसून मन्त्रशक्तीने त्यांचा प्रयोग होत होता व ही शक्ति अनेक वर्षे तपश्चर्या करून प्राप्त होत होती.

पण या सगळ्याला प्रमाण काय? एवढ्या विद्या जर आमच्या पूर्वजांना येत होत्या तर त्या लुप्त होऊ नये म्हणून काही व्यवस्था करण्याची विद्या त्यांना का येत नव्हती? एखाद्या शत्रूनें या विद्या लुप्त व्हाव्या म्हणून त्या जाणणाऱ्यांना वेचून वेचून मारले म्हणावे तर हे शत्रू इतक्या अचाट विद्या जाणणाऱ्यांपेक्षाही वरचढ होते असे मानावे लागते. वरचढ लोक कोण?

रामायण महाभारतातील ९० टक्के भाग अदभूतरम्य व काल्पनिक आहे यात संशय नाही. पण राम व कृष्ण हे ऐतिहासिक पुरूष नव्हते हे रामायण महाभारतातील मध्यवर्ती घटना ऐतिहासिक नाहीत असे म्हणता येत नाहीत याचे एक कारण असे की बोलूनचालून कादंबरी लिहायला बसलेला लेखक देखील शेकडो पृष्ठे सर्वस्वी काल्पनिक असे काही लिहू शकत नाही. वि.स. खांडेकर यांनी कादंबऱ्या लिहिल्या पण त्या कादंबऱ्यावरून त्यांच्या स्वत:च्या आयुष्याबद्दल काही अनुमाने काढता येतात. फडक्यांनी देखील कादंबऱ्याच लिहिल्या पण त्यातील पुष्कळशी पात्रे त्यांना आयुष्यात भेटलेली वा ऐकून माहिती असलेली आहेत.काही पात्रे जशीच्या तशी खरी नसली तरी एकदोन खऱ्या पात्रांचे मिश्रण करून रंगविलेली आहेत. बोलून चालून कादंबरी लिहायला बसलेल्या लेखकाला जर सर्वस्वी काल्पनिक असे काही लिहिता येत नाही तर व्यास वाल्मीकीसारखे जे लेखक आम्ही इतिहास लिहित आहोत असा दावा सांगतात व जो इतिहास आहे अशी या देशात परंपरा आहे ते सर्वस्वी काल्पनिक अशी हजारो पृष्ठे लिहितील असा संभव नाही.

रामायणापेक्षा महाभारताची ऐतिहासिकता अधिक निर्विवाद आहे.याचे कारण असे की भारतीय युद्ध केव्हा झाले याचे वर्ष महाभारतात दिले आहे. ते म्हणजे द्वापर संपल्यावर व कलियुग सुरू होण्याच्या आधी. भारतीय युद्ध ३१०१ ख्रिस्तपूर्व या काळी झाले असे ऐहोळे शिलालेखात लिहिले आहे. ऐहोळे शिलालेख शके ५५६ म्हणजे इसवी सन ६३४ चा आहे. शिलालेखात काळ सांगण्यासाठी कलियुगाचा उपयोग करीत व युद्धिष्ठिराने युद्धाचे स्मारक म्हणून कलियुगगणना सुरू केली. यावरून भारतीयुद्ध ऐतिहासिक होत असे अनुमान काढता येते. राम रावणयुद्धाचा वा रामाच्या राज्याभिषेकाचा असा काळ सांगितला जात नाही.

### महाभारतग्रंथातील अनेक स्तर

भारतीय युद्धाच्या ऐतिहासिकतेबद्दल दुसरे प्रमाण पुरातत्वीय आहे. ख्रि. पू. ३१०१ हा ताम्रपाषाणयुगाचा काळ आहे. म्हणजे याकाळी दगडाची व ताम्ब्याची हत्यारे वापरली जात होती, कासे व लोखंड यांची हत्यारे करण्याची कला अवगत झाली नव्हती. कुरूक्षेत्राच्या परिसरात उत्खनन करता तेथे तांब्याची मिशीची तरवार, भाल्याचे वा बाणांचे फाळ व एक मानवाकृति चक्राकार डोक्याचे सुदर्शन चक्रासारखे चक्र सापडले आहे. पुरातत्त्वीय पद्धतीने या शस्त्रांचा काळ २८०० ख्रि. पू. हा ठरविण्यात आला आहे. हा काळ कलियुगारम्भाच्या जवळपास येतो.

रामायण व महाभारतकथा सर्व भारतीयांना माहीत आहे पण रामायण महाभारत या ग्रंथांच्या स्वरूपाबद्दल सुशिक्षितात देखील बरेच अज्ञान आहे. महाभारत हा ग्रंथ व्यासाने व रामायण हा वाल्मीकीने लिहिला हे प्रसिद्ध आहे. पण आज उपलब्ध असलेल्या रामायणाचे सारे २४००० श्लोक वाल्मीकेने व महाभारताचे सारे एक लक्ष श्लोक व्यासाने लिहिलेले नाहीत, व्यासाने फक्त

२४,००० श्लोक लिहिले असे महाभारतातच सांगितले आहे. पण वस्तु त: व्यासाने २४००० देखील श्लोक लिहिले असण्याचा संभव नाही. याची कारणे अशी आहे.

व्यास भारतीय युद्धकाली म्हणजे ३१०१ ख्रिस्तपूर्व या काली झाले. पण उपलब्ध महाभारतात याच्या हजारो वर्षे नंतरच्या घटनांचे उल्लेख आहेत. जसे रोमन नाणे दीनार, भुयाराला सुरूंगा हा शब्द व ग्रीक भाषेचा उल्लेख, शक हूणांचे उल्लेख, बुद्धाचा उल्लेख हे सारे ख्रि.पू. ५०० च्या नंतर झालेल्या एखाद्या लेखकाने महाभारत उल्लेखिलेले आहे. यापूर्वी १५०० -२५०० या सहस्त्रकाळी परिस्थिती दाखविणारे. अनेक उल्लेख आहेत. उदाहरणार्थ कार्तिकात शरदऋतूचा अंत होणे, मार्गशीर्षात हेमन्ताची सुरुवात व काशाच्या तरवारीचा उल्लेख. हा उल्लेख जयद्रथ/ अभिमन्यु युद्धात आहे. जयद्रथाने अभिमन्यूस तरवार मारली. ती अभिमन्यूने चुकविली तेव्हा ती अभिमन्यूच्या भात्यात अटकली. जयद्रथाने ती जोराने ओढली तेव्हा तिचे तुकडे झाले. चामड्याच्या भात्यात अडकून याप्रमाणे तुटणारी तरवार लोखंडाची असू शकत नाही. ती काशाचीच असली पाहिजे.

यापूर्वीच्या ख्रिस्तपूर्व २५०० ते ३००० या काळातली परिस्थिती सुचविणारे पुढील उल्लेख आहेत.

भूरिश्रव्याने सात्यकीला मारण्यासाठी आपले खडग उगारले केस धरून तो ते त्याच्या मानेवर चालवू लागला. धृष्टद्युम्नही याचप्रकारे द्रोणाचार्यांचे केस पकडून त्यांची मान तरवारीने कापतो. केस धरून मानेवर खड्ग चालविण्याच्या या प्रकारावरून हे खडग काशाचे वा लोखंडाचे नव्हते हे स्पष्ट आहे. ते तांब्याचेच असले पाहिजे. लोखंडाच्या वा काशाच्या तरवारीने सरळ मानेवर प्रहार करून एका प्रहारानेच शिर उडविता येते, कारण तांब्याचे वा काशाचे खडग पूर्ण लांबीचे करता येते व त्याचा भार एका झटक्यातच मान उडविण्याइतकी तीक्ष्ण असते. तांब्याची पूर्ण लांबीची तरवार करता येत नाही व तिची धार तीक्ष्ण नसते. उत्खननात सापडलेले ख्रि.पू. २८०० च्या सुमाराचे खडग हे लढाईत वापरण्यासारखे नाही. ते वाकू नये म्हणून मध्यभागी ते दंडासारखे जाड केलेले आहे. त्याच्या या भागात धार नाही. ७५ सेंण्टिमीटरच्या तरवारीत धारदार पाते फक्त पाच सेंण्टिमीटरचे आहे.

ख्रिस्तपूर्व २५००च्या पूर्वीचा दुसरा उल्लेख भीष्माच्या निर्याणसमयी माघ शुक्ल अष्टमीला सूर्याचे उत्तरायण सुरू झाले हा होय. डॉ. राघवन् यांनी गणित करून हा उल्लेख भीष्माच्या निर्याणसमयी माघ शुक्ल अष्टमीला सूर्याचे उत्तरायण सुरू झाले हा होय. डॉ. राघवन यांनी गणित करून हा उल्लेख ख्रि.पू. ३०० च्या सुमाराचा आहे हे दाखवून दिले आहे.

याच सुमारास म्हणजे कलियुगारंभी, सर्व ग्रह एकत्र होते व सूर्यातून ते निघताना दिसले असे महाभारतात वर्णन आहे. उस्मानिया विश्वविद्यालयातील खगोलचे प्रोफेसर अभ्यंकर यांनी संगणकाच्या साह्याने गणित करून असे खरोखच घडले. सूर्योदयापूर्वी तीन व सूर्यास्तानंतर चार ग्रह क्षितिजावर दिसले होते हे सिद्ध केले आहे.

**डॉ. लाल यांचा विचित्र सिद्धांत**

तात्पर्य, महाभारत ग्रंथात ख्रि.पू. ३१०१ या कालापासून तो ख्रिस्तयुगाच्या प्रारंभापर्यंतचे उल्लेख सापडतात तेव्हा असा हा ग्रंथ व्यासाने सर्वच्या सर्व कलियुगारंभी लिहिला असेल हे संभवत नाही.

काही लोक असे म्हणतात की नंतरचा काल दाखविणारे श्लोक सोडून बाकी सर्व श्लोक व्यासाने लिहिले पण असं मानता येत नाही. कारण नंतरचा काल दाखविणारे श्लोक साऱ्या महाभारतात विखुरलेले आहेत. त्यांची संख्या हजारांनी मोजता येण्यासारखी आहे शिवाय केवळ तुरळक उल्लेखच नसून त्याकाली उपलब्ध असलेले वाङ्मय व तत्त्वज्ञान यांचा परिचय लेखकाला होता हे

निर्विवादपणे दिसून येते. तसेच काही श्लोकच केवळ नसून बरीच पर्वे मागाहून लिहिलेली आहेत. उदाहरणार्थ भीष्म शरपंजरी पडल्यानंतर पांडव ८ दिवस युद्धात गुंतलेले व त्यानंतर ५० दिवस हस्तिनापुरात होते व त्यानंतर भीष्मांचे प्राण कंठाशी आले असे कळल्यावरून त्याला भेटायला गेले असा स्पष्ट उल्लेख आहे. या उल्लेखावरून पांडव ५८ दिवस भीष्माकडून शांतिपर्वात केलेला धर्माचा उपदेश ऐकत होते हे खोटे ठरते व सारे शांतपूर्वक मानावे लागते.

महाभारतात भर टाकणाऱ्यांनी नुसता नवा भाग टाकला पण जुन्या भागाला हात लावला नाही असेही नाही. व्यास कलियुगारंभी झाले. तेव्हापासून ख्रिस्तियुगाच्या सुरूवातीपर्यंत ३००० वर्षे होतात. म्हणजे ३००० वर्षेपर्यंत उपलब्ध महाभारताची रचना होत होती. नवीन भर घालणाऱ्यांनी जर जुना भाग तसाच ठेवला असता तर जुना भाग कोणता हे त्याच्या जुन्या भाषेवरून सहज ओळखू आले असते. पण ही सोय नाही. महाभारतात सर्वत्र एकाच प्रकारची भाषा आहे म्हणजे नवीन भाग रचणाऱ्यांनी केवळ नवीन भाग रचला असेच केवळ नसून जुन्या भागाची भाषाही आपल्या काळच्या लोकांना कळावी म्हणून दुरूस्त केली.

असा प्रकार त्याकाळी होणे फार सोपे होते. कारण ग्रंथाचा प्रसार मुखानेच होत असे. लिहिलेला ग्रंथ फक्त सूत नावाच्या पौराणिकांची जी जात होती त्यांच्याजवळ असे व ते हा ग्रंथ जास्त परिणामकारक होता असे त्यांना वाटले तर तशी भर घालण्यापासून त्यांना कोणीच रोखू शकत नव्हते.

महाभारताची रचना ३००० वर्षेपर्यंत होत होती ही गोष्ट सनातनी लक्षात घेत नाहीत. त्याचप्रमाणे आधुनिक पुरावेत्तेही लक्षात घेत नाहीत. नुकतेच डॉ. लाल या पुरावेत्त्याने हस्तिनापुर व अयोध्या यांच्या परिसरात उत्खनन केले. त्यात त्यांना ख्रि. ९०० च्या पूर्वीचे अवशेष सापडले नाहीत व अयोध्येत सापडलेले अवशेष हस्तिनापुरात सापडलेल्या अवशेषापेक्षा अर्वाचीन आहेत. यावरून डॉ. लाल यांनी असा सिद्धांत मांडला की महाभारतापेक्षा रामायण अर्वाचीन आहे व या ग्रंथात वर्णिलेल्या घटना खि. पू. ९०० पेक्षा अधिक प्राचीन असू शकत नाहीत.

या प्रतिपादनात दोन हेत्वाभास आहेत. एक तर डॉ. लाल्यांनी हस्तिनापुर व अयोध्या येथील सारा परिसर खोदून काढला नाही. त्यामुळे तेथे अमुक सापडले नाही म्हणून ते तेथे नव्हतेच असे अनुमान काढता येत नाही.

दुसरे असे की महाभारतात कौरवांची व पुढे पांडवांची राजधानी म्हणून हस्तिनापुराचे वर्णन आहे ते सर्व व्यासांनी केलेले आहे असे लालांनी गृहीत धरले आहे. महाभारतातला कोणता भाग व्यासकृत आहे हे आज कुणालाच सांगता येत नाही. भारतीय युद्ध हा महाभारताचा केंद्रभाग व्यासकृत आहे हे आज कुणालाच सांगता येत नाही. भारतीय युद्ध हा महाभारताचा केंद्रबिंदु आहे व व्यासांच्या मूळ महाभारतात या युद्धाचे वर्णन करणारा काही भाग होता एवढेच निश्चितपणे म्हणता येते. पण महाभारतातील अमुक एक श्लोक नक्की व्यासांचाच असे प्रतिज्ञापूर्वक कोणीही सांगू शकत नाही. तेव्हा सारा हस्तिनापुराचा परिसर खणून काढल्यावरही हस्तिनापुर शहराचे काहीच अवशेष सापडले नाहीत तर महाभारतातील हस्तिनापुराचे वर्णन व्यासकालीन नाही एवढेच फक्त सिद्ध होईल, भारतीय युद्ध काल्पनिक आहे असे सिद्ध होणार नाही.

महाभारत हा ग्रंथ ३००० वर्षांच्या अवधीत लिहिला जात होता हे आज सर्वसामान्य आहे. पण रामायणही तसेच आहे हे फारसे

कुणाला माहीत नाही. वस्तुत: आज उपलब्ध असलेले सारे रामायण वाल्मीकीचे नाही. त्याचा फारच थोडा भाग रामाच्या वेळचा आहे याची स्पष्ट प्रमाणे रामायणात उपलब्ध आहेत.

रामायणाचा नारदवाक्यम् म्हणून पहिला सर्ग आहे. या सर्गात रामायणाचा सारांश सांगितला आहे. या सारांशात बालकांड व उत्तरकांड वगळलेले आहे.

यानंतर काव्यासंक्षेप नावाचा तिसरा सर्ग आहे. त्यात बालकांड व उत्तरकांड यांचा उल्लेख आहे, पण उत्तराकांड हे अनागत जाणणाऱ्या कवीने लिहिले असे म्हणून ते प्रक्षिप्त आहे याची कबुलीच दिली आहे. उत्तरकांडातील वृत्तांत अनागत होता म्हणजे कवीने तो लिहिला त्यावेळी तो घडलेलाच नव्हता. पुढे अनुक्रमणिका नावाचा सर्ग आहे त्यात कुश-लवांनी जे रामायण गायिले त्यात उत्तरकांड नव्हते असे स्पष्टच म्हटले आहे. तात्पर्य बालकांड व उत्तरकांड हे वाल्मीकीचे नाहीत. सात कांडापैकी दोन आल्या कांडाची भर ज्यात घातली गेली आहे ते रामायण महाभारताप्रमाणेच अनेककर्तृक आहे यात शंका बाळगण्यासारखे काही नाही.

रामायणाची रचना देखील महाभारताप्रमाणेच ख्रिस्ती सनाच्या आरंभापर्यंत होत होती हे दाखविणारा पुष्कळ भाग रामायणात आहे. रामायणात शक व यवन यांचा उल्लेख आहे. भारतीय सैनिक ख्रिस्तपूर्व ५०० च्या सुमारास इराणी सैन्याच्या ग्रीकांशी सतत लढाया होत होत्या. पण अखिल भारताला ग्रीकांचा परिचय झाला तो अलेक्झांडरच्या स्वारीमुळे. विश्वामित्राच्या प्रबळ सैन्याचा पराभव करण्यासाठी वसिष्ठाच्या कामधेनूने शक व यवन निर्माण केले असे वर्णन आहे हे वर्णन भारतीयांना शक व यवन म्हणजे ग्रीक यांच्या सैनिक सामर्थ्याचा प्रत्यय आल्या नंतरचे म्हणजे ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकाच्या नंतरचे आहे.

रामायणात बुद्धाचा निंदापूर्वक उल्लेख आहे. त्याअर्थी दखल घेण्याइतका प्रसार झाल्यानंतरचे म्हणजे अशोकाच्या नंतरचे हे वर्णन आहे हे स्पष्ट आहे.

याच्या पूर्वीचा उल्लेख ख्रिस्तपूर्व २५०० ते ख्रिस्तपूर्व १५०० च्या दरम्यानचा आहे. तो म्हणजे श्रावण महिन्यात पावसाळा सुरू होतो हा. याच्याही पूर्वीचा उल्लेख रामाचा जन्म चैत्र शुद्ध नवमीला झाला व त्या सुमारास हिवाळा संपला हा आहे. याला पुष्टि देणारा उल्लेख किषिकिंधाकांडात भाद्रपद हा पावसाळ्याचा पहिला महिना व अरण्याकांडात पौष हा हेमंताचा पहिला महिना म्हणून सांगितला आहे. हे उल्लेख ख्रि. पू. ३७०० चे आहेत.

तात्पर्य रामायणात देखील महाभारताप्रमाणेच ख्रिस्तपूर्व तीन सहस्त्रकातील निरनिराळे उल्लेख आहेत.प्राचीनतम उल्लेख महाभारतापेक्षा सुमारे ७०० वर्षांनी अधिक प्राचीन आहेत.

भारतीययुद्धाकाली तरवारीचा शोध लागला नव्हता त्याअर्थी त्याच्या ७०० वर्षे आधी रामाच्या काळी तो लागला नव्हता यांत संशय नाही. राम, लक्ष्मण, वाली, हनुमान रावण, इन्द्रजित, वगैरे कोणत्याही योदध्याने तरवार उपसून युद्ध केल्याचे वर्णन नाही. वानर हे दूरप्रहारासाठी धनुष्यबाणांचाही उपयोग करीत नसत. त्यांचे वर्णन 'तालशालशिलायुद्ध' म्हणजे तालादि झाडे व शिळा यांनी युद्ध करणारे असे केले आहे. तालादि झाडांचे मोठमोठे मुद्गल करीत. याच गदा होत व त्यांनी वानरयुद्ध करीत. दूरप्रहारासाठी ते गोफणींचा वापर करीत असावेत. गोफणीने धनुष्यबाणांइतका अचूक नेम मारता येत नाही पण दोन सैन्याचे युद्ध असेल तर एखाद्याच लक्ष्यावर अचूक नेम मारण्याची फारशी जरूर नसते.

रामायणकथेतील ऐतिहासिक दृष्ट्या लक्षात ठेवण्यासारखा एक मुद्दा म्हणजे रामाने समुद्रावर सेतु बांधला हा होय. समुद्रावर सेतु बांधून सैन्य नेल्याचे उदहारण नाही. रामाने तसे केले याचे कारण असे की लंका व भारत यांच्यामध्ये एक सलग भूभाग होताच व याच भूभागावरून रावण खेचराच्या रथाने येत जात असे. तोच

मार्ग रामाने सैन्या नेता यावे म्हणून रूंद केला.तो सेतूला आधार देण्यासाठी समुद्रात स्तंभ रोवीत बसला नाही.

लंका व भारत यांच्यामध्ये सेतु बांधण्याइतका समुद्र खडकांनी व्यापलेला आहे ही गोष्ट आज बहुसंख्य भारतीयांना माहीत नाही, त्याचप्रमाणे ती रामायणकथा सांगणाऱ्या कोणत्याही लेखकाला माहीत नाही. महाभारतात जी रामकथा सांगितली आहे तिच्यात रामाने नावांचा उपयोग न करता सेतु का बांधला हा प्रश्न उपस्थित केला आहे व इतक्या मोठ्या प्रमाणावर नावा उपलब्ध नव्हत्या असे त्यावर समाधान केले आहे. हे समाधान पटण्यासारखे नाही. नावा आयत्या उपलब्ध नव्हत्या तर त्या बनविता आल्या असत्या, सेतू बनविण्यापेक्षा नावा बनविण्यास जास्त वेळ लागला असता काय?

सेतुबंधाचा भूगोल माहीत नसल्यामुळे उत्तरकालीन कवींनी समुद्र रामापुढे मानवरूपाने प्रकट होऊन शरण येणे, मारूतीने समुद्रावररून उड्डाण करणे, रावणाने पुष्पक विमानातून सीतेला नेणे वगैरे कल्पना केल्या आहेत. यापैकी कोणताच भाग वाल्मीकीच्या मूळ रामायणांत असण्याचा संभव नाही. वाल्मीकीचे मूळ रामायण हजार श्लोकांपेक्षा मोठे नसावे.

राम व वाल्मीकि, पांडवांच्या व व्यासाच्या आधी झाले अशी परंपरा आहे. राम पांडवांच्या ३१ पिढ्या पूर्वी झाल्या असे भागवतात सांगितले आहे. कालविपर्यास संस्कृत वाङ्मयात विपुल आहे. दोन्ही ग्रंथात ३००० वर्षेपर्यंत भर पडत होती तरी रामायणात भर टाकणाऱ्या साऱ्या लेखकांना रामायण महाभारताच्या आधीचे आहे याची एवढी तीव्र जाणीव आहे की त्यांनी महाभारतातील कोणत्याही घटनेचा रामायणात उल्लेख न करण्याची दक्षता बाळगली आहे. महाभारतात मात्र सारे रामकथा व रामायणातला एक श्लोक देखील उदधृत केलेला आहे.